**ई-मेल दवारे**

जावक क्र. विपोमनि / 673 / महा.सायबर / सायबर सुरक्षा / 2020
विशेष पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्रसायबर, मुंबई. यांचे कार्यालय,
जागतिक व्यापार केंद्र, सेंटर– 32 वा मजला,
कफ परेड, मुंबई– 400005.
दिनांक – 17 / 03 / 2020.

प्रति,

सर्व मा. पोलीस आयुक्त,
सर्व पोलीस अधीक्षक.

**(लक्षवेध – सायबर पोलीस ठाणे / सायबर सेल नोडल अधिकारी)**

विषय – कोरोना व्हायरस **(COVID-19)** संदर्भातील अफवा थांबविणेसाठी ॲडव्हायझरी प्रसारीत करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये कोरोना व्हायरस (COVID-19), या विषाणुंच्या प्रभावाने जगात भितीचे वातावरण तयार झालेले असताना ब–याच ऑनलाईन कम्युनिकेशन चॅनल, इंटरनेट, सोशल मिडिया आणि मेसेज व्दारे याबद्दल अफवा पसरत असल्याबाबत निदर्शनास येत आहे.

तरी सर्व देशभर पसरलेल्या कोरोना व्हायरस (COVID-19) बाबतच्या मार्गदर्शक सुचना कोणत्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहेत याबाबतची माहिती, तसेच वर नमुद केल्याप्रमाणे कोणीही चुकीची माहिती, अफवा पसरवत असल्यास त्या थांबविण्यासाठी योग्य ती कारवाई करणेबाबत महाराष्ट्र सायबर, मुंबई. या कार्यालयाने इंग्रजी व मराठी माध्यमामध्ये ॲडव्हायझरी तयार केलेली आहे.

सदरच्या ॲडव्हायझरी यासोबत जोडलेल्या आहेत. सदर ॲडव्हाझरी आपले घटकातील सोशल मिडीया प्लॅटफॉर्मवर तसेच योग्यत्या उपलब्ध मार्गाने जनतेमध्ये प्रसारीत करावी व कोरोना व्हायरस बाबत जास्तीत जास्त जनजागृती करावी. ही विनंती.

( डॉ. दिलीप पांढरपट्टे )
विशेष पोलीस महानिरीक्षक,
महाराष्ट्र सायबर, मुंबई.

Scanned by CamScanner

Advisory

# Advisory regarding fake news and rumors related to COVID-19coronavirus pandemic

**Office of the Special Inspector General of Police,**
**Maharashtra Cyber**
**World trade Centre , 32 Floor, Cuffe Pared, Mumbai**

Scanned by CamScanner

**Office of the Special Inspector General of Police,**
**Maharashtra Cyber**
**World trade Centre , 32 Floor, Cuffe Pared, Mumbai**

It has been noticed that certain malicious elements are spreading fake news and vicious rumors regarding the COVID-19 pandemic on online communication channels, internet, social media and various messaging platforms to cause panic, commit crime and disturb the public order in the state. In the time of such an epidemic, it is the duty of every citizens to stay informed and be responsible with what they share on social media.

The Maharashtra cyber department is advising any persons or organization to refrain from engaging in spreading fake news and rumors on various social media platforms and also traditional media sources and mischievous and harmful behavior which will disturb the public order. If it comes your notice about any person/ organization is involved in spreading/creating/publishing rumors / fake news or misinformation on any forms of media or messaging platform, it is encouraged to report it to the nearest police station/ cyber police station or lodge complaint at *www.cybercrime.gov.in*. Maharashtra Cyber police will take stringent action against those found spreading fake news / rumors or misinformation about the Corona virus disease.

As per the notification of Government of Maharashtra, Public Health Department dated 14th March 2020, "The Maharashtra COVID-19 Regulations 2020" has been released. This advisory is in lines to the The Maharashtra COVID-19 Regulations 2020 and any person / Institution / organization is found indulging in such activity, they will be held responsible and necessary action will be taken under

**Section 3 of THE EPIDEMIC DISEASES ACT, 1897**
**"Any person disobeying any regulation or order made under this Act shall be deemed to have committed an offence punishable under section 188 of the Indian Penal Code ,1860 "**

In light of the global pandemic, we urge the citizens to rely on official sources for all the information related to the COVID-19 for reliable and updated information.

A list of few official websites is given below-

- Ministry of Health, Government of India-
  The official website of the Ministry of Health, Government of India provides detailed information on the do's and don'ts related to the virus, travel advisories, safety measures, quarantine guidelines, and other useful information.
  https://www.mohfw.gov.in/

- World Health Organization-
  The official website of the World Health Organization hosts all the global updates related to the disease.

  https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019

We request everyone to follow the guidelines described on the above websites to stay safe of the coronavirus pandemic.

Scanned by CamScanner

## *कोरोना व्हायरस (COVID -19) बद्दल प्रसासरीत होणा-या खोट्या बातम्या*

## *(Fake News) / माहिती संदर्भात ॲडव्हायजरी.*

सदर ॲडव्हायजरी ही महाराष्ट्र राज्यातील नागिरकांना कोरोना व्हायरस संदर्भात प्रसारित होणाऱ्या खोट्या बातम्या व पसरणाऱ्या अफवांपासून सावध राहण्यासाठी जन हिथार्थ महाराष्ट्र सायबर तर्फे जारी करण्यात येत आहे .

MAHARASHTRA CYBER


विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर.

३२ वा मजला ,जागतिक व्यापार केंद्र,

कफ परेड ,मुंबई -४००००५


Scanned by CamScanner

विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र सायबर.
३२ वा मजला ,जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड ,मुंबई -४००००५

सध्या जगात सगळीकडे पसरणारा व धुमाकूळ घालणारा कोरोना व्हायरस (COVID -19) हा विषाणू आपल्या भारतात व महाराष्ट्र राज्यात जलदगतीने पसरत आहे. कोरोना व्हायरस (COVID -19) विषयी खोटया बातम्या आणि अफवा पसरविण्यासाठी विविध समाजमाध्यमांचा उदा : फेसबुक,ट्विटर ,इंस्टाग्राम ,युट्युब ,टिकटॉक व अन्य प्लॅटफार्मचा मोठया प्रमाणात वापर केला जात आहे .

महाराष्ट्रातील COVID-19 ची सद्यस्थिती पाहता महाराष्ट्र सायबर हे कार्यालय, COVID-19 विषयी खोटया बातम्या आणि अफवा पसरविणाऱ्यां विरोधात ॲडव्हायजरी जारी करत आहे.

महाराष्ट्र सायबरच्या असे निदर्शनास आले आहे की, समाजातील काही विकृत व गुन्हेगारी प्रवृत्तीचे घटक समाजमाध्यमाद्वारे मुद्दाम खोटया बातम्या व अफवा पसरवून समाजात व नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करीत आहे व समाजात शांतता भंग करुन अराजकता पसरविण्याचे प्रयत्न करीत आहे.

महाराष्ट्र सायबर या ॲडव्हायजरीद्वारे सर्व नागरिकांना अशा प्रकारच्या कृत्यामध्ये सहभागी न होता त्यापासून दूर राहण्याचे आवाहान करत आहे,जेणेकरून समाजात भीती व दहशतीचे वातावरण पसरण्यास आणि गंभीर समस्या निर्माण होण्यापासून प्रतिबंध होईल.

तसेच सर्व टिव्ही चॅनेल्स, सर्व वृत्तपत्रे यांना महाराष्ट्र सायबर विनंती करते की, कोरोना व्हायरस संदर्भातील कोणतीही बातमी खातरजमा करुनच प्रसारीत करावी.

नागरीकांनी अफवा पसरविणाऱ्या लोकांच्या तक्रारी जवळच्या स्थानिक पोलीस ठाण्यामध्ये किंवा www.cybercrime.gov.in यावर नोंद कराव्यात.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांची दिनांक 14/03/2020 रोजीची "The Maharashtra COVID-19 Regulations 2020" ही अधिसुचना जाहीर केलेली आहे. त्यानुसार कोणतीही व्यक्ती/संस्था कोरोना व्हायरस COVID-19 बाबत खोटया बातम्या अगर अफवा पसरवताना आढळल्यास त्यांना "THE EPIDEMIC DISEASES ACT, 1897" च्या कलम 03 अन्वये नमुद केल्याप्रमाणे जबाबदार धरले जाईल.

सदरचे कृत्य भारतीय दंड संहिता, 1860 च्या कलम 188 अन्वये दंडनीय अपराध असल्याचे समजले जाईल.

या अधिसुचनेचे पालन न करणाऱ्यांवर कायदेशिर कारवाई करण्याची सुचना महाराष्ट्र सायबर कडुन करण्यात येत आहे.

Scanned by CamScanner

महाराष्ट्र सायबर या अधिसुचनेद्वारे सर्व नागरिकांना विनंती करीत आहे की, कोरोना व्हायरस (COVID -19) संदर्भातील फक्त अधिकृत माहिती व बातम्यांवरच विश्वास ठेवावा. अशी अधिकृत माहिती खालील संकेत स्थळांवर उपलब्ध आहे .

- आरोग्य मंत्रालय, भारत सरकार-

भारत सरकारच्या आरोग्य मंत्रालयाची खालील अधिकृत वेबसाइट कोरोना व्हायरस COVID-19 या विषाणू विषयी माहिती, प्रवासी सल्लामसलत, सुरक्षितता उपाय, मार्गदर्शक तत्त्वे आणि इतर उपयुक्त माहितीशी संबंधित असलेल्या कार्ये आणि त्याबद्दल सविस्तर माहिती प्रदान करते.

https://www.mohfw.gov.in/

- जागतिक आरोग्य संघटना - **(WHO)**

जागतिक आरोग्य संघटनेची खालील अधिकृत वेबसाइट कोरोना व्हायरस COVID-19 या विषाणू विषयी सर्व माहिती उपलब्ध करीत आहे.

https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019

सर्व नागरिकांना आव्हान आहे की, त्यांनी सदर संकेतस्थळांना (Website) भेट देऊन त्यावरील कोरोना व्हायरस बाबत नमुद केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करावे व खबरदारी घेण्याचे उपाय वाचून सदर उपाय अमलात आणावेत

Scanned by CamScanner